**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1802/2007.**

श्री सुनिल के. अभिचंदानी
142, रेसीडेन्सी रोड,
स्दर नागपूर 440001. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सि. एस. डहाळकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
2) श्री डि. व्ही. सावरकर
जन माहिती अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी (महसूल)
नझुल अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.7.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.2.2007 रोजी नझुल अधिकारी नागपूर हयांचेकडे माहिती अधिकारी म्हणून 1) Copy of N.O.C. issued to Ravi Prakash Jangad concerning construction to Nazul Land of Sadar Plot No. 213 S.No. 22/30 Mouza Sitabuldi 2) Order copy of regarding N.O.C. passed by Nazul Officer 3) Copy of permanent lease deed of 1936 Plot no. 213 in the name of alice De Jeysees.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 8.3.2007 रोजी अपीलकर्ता यांनी सदर प्रकरणातील कोणत्याही कागदपत्राच्या प्रती त्यांच्या संमतीशिवाय आपणास देण्यात येवू नये असे दि. 8.2.2007 च्या अर्जान्वये लेखी कळविलेले आहे. तसेच माहितीचा अधिकार 2006 मधील तरतूदीनुसार त्रयस्थ व्यक्तीचे हरकतीनुसार आपण मागणी केलेले दसतऐवज आपणास पुरवता येणार नाही यांची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 16.3.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 30.4.2007 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता सुनावणीस हजर राहिले नाही या कारणास्तव अपील नस्तीबध्द करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्या निर्णयाने सुध्दा अपीलकर्ता हे व्यथित होवून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपील मेमोमध्ये अपीलकर्ता यांनी वारंवार कार्यालयात जावून विचारणा केली तरी सुध्दा सांगितले नाही. पत्र प्राप्त दि. 8.5.2007 अन्वये कळले की दि. 24.4.2007 रोजी सुनावणी होती. तसेच दि. 30.4.2007 रोजी सुनावणी आहे. याची माहिती प्राप्त झाली. ती सुनावणीची तारीख संपूर्ण 9 दिवसानंतर कळली. पत्र क. 4287 पी.ए/एसीकावी जिल्हाधिकारी दि. 21.3.2007 चे दि. 4.5.2007 ला पोस्ट केलेले आहे. याचा पोस्टाचा

शिक्का लागलेला आहे. त्रयस्थ व्यक्तीची माहिती मागितली असता अपीलकर्ता यांनी Decision No.144/1C(A)/2006-F No.CIC/MA/2006/00237 Dt. 25th July 2006 अशी केंद्रिय माहिती आयोगाच्या निर्णयाची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. त्यावर मी द्वितीय व्यक्ती असून मला माहिती देणे अनिवार्य आहे. त्रयस्थ पक्षाच्या हिताला हानी होत असेल तरी सुध्दा माहिती प्रकट करता येते असे नमुद केले आहे. मागील 20 वर्षापासून विभिन्न कोर्टात नझुल विभाग, अपीलकर्ता व रविप्रकाश जांगडे इत्यादीचा दावा सुरु आहे. त्यामुळे मला त्रयस्थ व्यक्ती म्हणता येणार नाही. त्याकरीता पान क्र. 10 ते 10/12 वर न्यायालयाचे निर्णयाची छायांकित प्रत दाखल केली आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे शास्तीची विनंती केलेली आहे.

3. अपीलकर्ता यांच्या अर्जातील जी माहिती त्यांनी मागितलेली आहे त्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की शासनाची जमीन आहे व शासनाने भाडेपट्टयाने जमीन दिलेली असल्याने त्या भाडेपट्टयाची प्रमाणित प्रत तसेच जमिनीवरील बांधकामाच्या संदर्भातील ना हरकत प्रमाणपत्राची प्रत अशी मागितलेली माहिती हा सार्वजनिक दस्तऐवज होतो. व त्यामुळे ही त्रयस्थ पक्षाची माहिती होत नाही. अधिनियमाच्या कलम 11 प्रमाणे त्रयस्थ पक्षाची माहिती याचा अर्थ त्रयस्थ पक्षाने जन माहिती अधिकारी यांचेकडे पुरविण्यात आलेली माहिती व ती माहिती गोपनीय समजली जाणारी कोणतीही माहिती असे जर कळविले असेल तसेच ती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असेल तर ती त्रयस्थ पक्षाची माहिती होते व त्याकरीता अर्जदाराचा अर्ज आल्यानंतर त्रयस्थ पक्षाची संमतीकरीता 10 दिवसाचे आंत कारवाई पुर्ण करावयाची असते. सदरच्या प्रकरणामध्ये अर्जदाराचा अर्ज दि. 17.2.2007 रोजी करण्यापुर्वीच दि. 8.2.2007 रोजी रविप्रकाश जांगडे यांनी नझुल अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय असे कळविलेले

4

दिसते. याचा अर्थ अधिनियमाच्या तरतुदीच्या प्रमाणे कळविलेले नसुन स्वतंत्रपणे स्वतःहुन कळविलेले आहे. ही कृति अनाकलनीय आहे. जन माहिती अधिकारी यांनी अर्ज आल्यानंतर वर नमुद केल्याप्रमाणे प्रक्रिया सुरु करावयाची असते व त्यामुळे रविप्रकाश जांगडे यांच्या दि. 7.2.2007 चे पत्र विचार करण्याची आवश्यकता नव्हती. व शासनानेच जमीन भाडेपट्टयाने जर दिलेली असेल तर ती रविप्रकाश जांगडे यांनी पुरविलेली माहिती होत नाही किंवा त्यांची वैयक्तिक माहिती होत नाही. व त्याच वेळेस अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्याकरीता तात्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. त्याचप्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय जरी दिलेला असला तरी दि. 17.3.2007 रोजी दि. 19.4.2007 रोजी सुनावणीस यावे असे जे पत्र दिलेले आहे त्यावर जावक नंबर हा स्पष्ट दिसून येत नाही. दि. 16.4.2007 रोजी दिलेले पत्र त्यावर जावक नंबर हा स्पष्ट दिसून येत नाही. दि. 21.3.2007 च्या पत्रावर जावक नंबर दिसून येतो. पण सदरचे पत्र अपीलकर्ता यांना दि. 4.5.2007 रोजी पोस्टात टाकलेले दिसून येते व दि. 5.5.2007 रोजी मिळालेले दिसून येते. यावरुन सुनावणीचे जे पत्र दिलेले आहे ते निर्णयाच्या नंतरच पाठविलेले आहे असे दिसते व त्याकरीता डिस्पॅच जावक लिपीक असतील तेही दोषी आढळुन येतात. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी टाळाटाळ केलेली आहे अशी आयोगाची खात्री झाली असल्याने अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कलम 11 ची कार्यवाही न करताच आल्या पुर्वीच या अर्जाचा आधार घेवून त्रयस्थ पक्षाची माहिती आहे असे कळविलेले असल्यामुळे जाणुनबुजुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळलेले आहे. व त्यामुळे कलम 20 प्रमाणे दोषी आढळुन येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द रु. 5000/– ची शास्ती लादण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी खुलासा सादर करावा. खुलासा सादर न केल्यास शास्ती कायम होईल. याबाबतची माहिती ही विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांना अवगत करावे.

3) प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या नोटिसाच्या संदर्भामध्ये वर विवेचन केल्याप्रमाणे चौकशी करुन संबंधित कर्मचा–याविरुध्द चौकशी करुन योग्य ती शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 22.7.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.